राज्य सेवा हक्क आयुक्त यांचे कार्यालय, कोकण महसुली विभाग
कक्ष क्र. 727/721, 7 वा मजला, कोकण भवन, नवी मुंबई - 400 614
दूरध्वनी क्र 20870515 Email - crts.konkan@maharashtra.gov.in

क्र. बाहययं-२०२६/प्र.क्र.२८/कक्ष-२/५११ दि. २६ ऑक्टोंबर, २०२६

## निविदा सुचना

राज्य सेवा हक्क आयोग, कोकण महसुली विभाग, कोकण येथे बाह्ययंत्रणेद्वारे ०२ शिपाई यांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्याकरीता मासिक दरावर एक वर्षाच्या कालावधीसाठी सेवासंविदा करार करावयाचा असून, याकरीता निविदेमधील अटींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक व पात्र नोंदणीकृत संस्थांकडून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

२. निविदेच्या अटी व शर्ती विचारात घेवून तांत्रिक लिफाफा व अतांत्रिक लिफाफा असे दोन स्वतंत्र बंद लिफाफे सहसचिव, राज्य सेवा हक्क आयोग, कोकण भवन, ७ वा मजला, रुम नं. ७२१, नवी मुंबई येथे दि.२६.१०.२०२६ ते ३० .१०.२०२६ पर्यंत जमा करावेत. त्यानंतर आलेली निविदा स्वीकारण्यात येणार नाही. दोन लिफाफा पध्दतीने निविदा सादर न केल्यास निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

३. प्राप्त निविदा उघडण्याची तारीख, वेळ निविदाकाराने लिफाफ्यावर नमूद केलेल्या e-mail पत्त्यावर/भ्रमणध्वनी क्रमांकावर कळविण्यात येईल. त्यासाठी लिफाफ्यावर e-mail तसेच भ्रमणध्वनी (Mobile) क्रमांक स्पष्टपणे नमूद करावा, याबाबतची जबाबदारी निविदाकाराची राहील.

आपली विश्वासू,

(फरोग मुकादम)
सहसचिव
राज्य सेवा हक्क आयोग
कोकण महसुली विभाग

अटी व शर्ती:-

१. दरपत्रके विहीत वेळेत प्राप्त न झाल्यास स्विकारले जाणार नाही.
२. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत व याबाबत कोणतेही स्पष्टीकरणे दिली जाणार नाहीत.

बाहययं-२०२६/प्र.क्र. २८/कक्ष-२
राज्य सेवा हक्क आयोग, कोकण महसुली विभाग,
कक्ष क्र.७२७, ७ वा मजला, कोकण भवन (विस्तार इमारत), नवी मुंबई-४०० ६१४
ई-मेल:- crts.konkan@maharashtra.gov.in
फोन नंबर- ०२२ २०८७०५१५
दिनांक :२६/१०/२०२६
प्रत : कार्यालयाच्या नोटिस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.

**१) सर्वसाधारण सूचना:-**

१. निविदाकाराने निविदा सादर करण्यापूर्वी खालील शासन निर्णय/ परिपत्रक / अधिसुचनांचे अवलोकन करावे:-

अ.उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय, क्रमांक भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग-I/ उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६.

ब. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय, क्रमांक भांखस २०२१/ प्र.क्र.८/ उद्योग-४, दिनांक ०७मे, २०२१.

क. वित्त विभाग शासन निर्णय क्र. पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क., दि.२७ एप्रिल, २०२२.

ड उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय संकीर्ण-२०१९ प्र.क्र.१३/कामगार-८, दिनांक २२.०२.२०१९

इ. केंद्र शासनाचे बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरवठासंदर्भातील सेवाशुल्क मर्यादेबाबतचे ज्ञापनक्र.F.६/१/२०२३-PPD, दिनांक ०६ जानेवारी, २०२३

२. संस्थेचे मुख्यालय महाराष्ट्रात असणे व त्या संबंधीचा कागदोपत्री पुरावा सादर करणे आवश्यक आहे. मनुष्यबळ पुरविणाऱ्या नोंदणीकृत संस्थांची कार्यालये मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे महानगरपालिका किंवा नवी मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीत असेल, अशा निविदाकारांना प्राधान्य दिले जाईल.

३. सदर निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापासून १२० दिवस वैध राहील. तसेच, निविदेतील दर हे १ वर्ष कालावधीकरीता अथवा पुढील सेवा करार होईपर्यंत लागू राहतील.

४. निविदाकाराने निविदा सादर करण्यापूर्वी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाचा किमान वेतनाचा शासन निर्णय संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३/ कामगार-८, दिनांक २२.०२.२०१९ मधील कर्मचा-यांना देय असलेले भत्ते व इतर सवलती यांचे अवलोकन करुन निविदा सादर करावी.

**२) शिपाई पदासाठी पुढील अहर्ता असणे बंधनकारक आहे:-**

१. शिपाई किमान दहावी इयत्ता उत्तीर्ण असावा. त्याला मराठी / हिंदी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे. तसेच भारतीय नागरीक असावा.

२. शिपाई यांचे वय १८ वर्षे पूर्ण असावे व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. शिपाई महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

४. शिपाई यांना शासनाच्या कार्यालयात काम करण्याचा किमान १ वर्षे कालावधीचा अंनुभव असावा.

५. शिपाईविरुद्ध कोणताही गुन्हा दाखल नसावा.

**३) बयाणा रक्कम :-**

१. निविदा स्पर्धेत भाग घेणा-या निविदाकाराने रु.१००००/- इतकी बयाणा रक्कम (EMD) विहीत स्वरुपात तांत्रिक लिफाफ्यासह जमा करणे आवश्यक आहे.

२. बयाणा रक्कम (EMD) भरण्यापासून विहित निकषानुसार सूट असल्यास, त्याबाबतचे नजिकच्या काळातील सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सही शिक्क्यासह संबंधित निविदाकाराने निविदेसोबत सादर करणे बंधनकारक राहील.

३. निविदा स्विकारल्यानंतर किंवा वैधता कालावधी समाप्तीनंतर यापैकी जे आधी घडेल ते, त्यानुसार अयशस्वी निविदाकारांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल.

४. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल.

५. बयाणा रक्कमेवर (EMD) कोणतेही व्याज देय असणार नाही.

### ४) अनामत रक्कम (Security Deposit): -

१. यशस्वी निविदाकाराच्या बाबतीत उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दि. ०१ डिसेंबर, २०१६ मधील मुद्दा क्र. ४.६ नुसार राज्य सेवा हक्क आयोग, कोकण महसुली विभाग, कोकण यांच्याकडे कंत्राट मुल्याच्या ३ टक्के इतकी अनामत रक्कम १५ दिवसांच्या आत शासन निर्णयात नमूद प्रकारे/स्वरुपात जमा करणे बंधनकारक राहील. तसेच, आवश्यकतेनुसार सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४.६ मधील अ) ते ई तरतूदी लागू राहतील. यशस्वी निविदाकाराने करारातील अटी व शर्तीचा भंग केल्यास सदरची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२. या कराराच्या किंवा अन्य कराराच्या अटीनुसार कंत्राटदाराकडून देय असलेली सर्व नुकसान भरपाई किंवा इतर रकमा या अनामत रकमेमधून वजा केल्या जातील.

३.अनामत रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

४. करार संपल्यानंतर ९० दिवसांच्या मुदतीत निविदाकारास अनामत रक्कम परत दिली जाईल.

### ५) अस्विकृती:-

१. राज्य सेवा हक्क आयोग, कोकण महसुली विभाग, कोकण येथील अधिकारी/कर्मचा-यांचे नातेसंबंधातील जवळच्या नातेवाईकांना या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. सदर प्रयोजनासाठी जवळच्या नातेवाईकांची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे:-

(अ) हिंदू अविभक्त कुटुंबाचे सदस्य

(ब) त्यांचे पती किंवा पत्नी

(क) वडील, आई, मुलगा, सून, मुलगी, जावई, भाऊ, बहिण, यांच्याप्रमाणे संबंधित असलेले.

२. ज्या निविदाकार संस्थेची यापूर्वी शासकीय/निमशासकीय/सहकारी संस्था यांना सेवा पुरविण्याकरीता निवड केली होती, अशा निविदाकार संस्थेविरोधात कोणतीही तक्रार संबंधित कार्यालयास प्राप्त झाली होती व त्या तक्रारीत तथ्य असेल अथवा त्या तक्रारीचे रितसर निवारण झालेले नसेल, अशा निविदाकार संस्थेला या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही. तसेच, अशा निविदाकाराची अन्य संस्था असल्यास त्या संस्थेला किंवा त्या कंत्राटदाराच्या जवळच्या नातेवाईकाची वा भागीदाराची अन्य संस्था असेल तर अशा संस्थेला किंवा कंत्राटदाराला निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येणार नाही.

### ६) निविदा खालील कारणास्तव नाकारण्यात येतील:-

१. निविदाकारांनी निविदा सादर करण्याबाबत निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन केले नाही.

२. निविदाकारांनी निविदा किंवा निविदा प्रक्रियेत कोणत्याही कामाचे किंवा परवानगी दिलेल्या वेळेत किंवा अन्य कोणतीही परिस्थितीत बदल करण्याचे प्रस्तावित केले असेल,

३. निविदाकारांनी दस्तऐवजाच्या कोणत्याही पृष्ठावर कोणतीही सुधारणा, वाढ व फेरबदल केले असेल.

४. निविदा नमुन्यामधील कोणतीही पृष्ठे काढून टाकली असतील किंवा बदल केले असेल.

५. निविदाकाराने कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) कायदा, १९७० आणि महाराष्ट्र कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) नियम, १९७० च्या खाली आवश्यक असणारी सहाय्यक कामगार आयुक्त यांच्याकडे नोंदणी असल्याची मूळ परवान्याची प्रत किंवा प्रमाणित प्रत सादर केलेली नाही.

६. निविदाकारांनी मागणीनुसार मूळ कागदपत्रे तपासणीसाठी सादर न केल्यास अथवा अपूर्ण सादर केल्याचे आढळल्यास सदर निविदा, निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

७. निविदाकाराने अतांत्रिक/वित्तीय निविदेमधील दर अंक व अक्षरामध्ये सादर केलेले नाही.

**७) सुरक्षा ठेव (अनामत रक्कम)**

**खालील प्रकरणी जप्त केली जाईल:-**

१. कार्यादेश दिलेला निविदाकार स्विकृत निविदा कालावधीत कोणत्याही कारणाने सेवा पुरविण्यास असमर्थ ठरल्यास.

२. स्विकृत निविदाकाराने निविदा कालावधीत उपलब्ध करुन दिलेल्या कर्मचा-यांची वेतन व भत्ते इत्यादीची देणी थकित असल्यास.

३. निविदेतील अटी व शर्तीचा भंग केल्यास.

**८) कायद्याचे नियमन व विवादाचा निपटारा:-**

१. कार्यादेश व करारासंबंधीत उद्धवलेल्या कोणत्याही वादग्रस्त मतभेदाचे सह सचिव राज्य सेवा हक्क आयोग तथा अध्यक्ष, खरेदी समिती, राज्य सेवा हक्क आयोग, कोकण महसुली विभाग, कोकण आणि संस्थेचे प्रतिनिधी थेट चर्चा करुन सौदार्हपूर्ण वातावरणात निराकरण करण्याचा प्रयत्न करतील.

२. कराराच्या अनुषंगाने यशस्वी निविदाकार संस्था व राज्य सेवा हक्क आयोग, कोकण महसुली विभाग, कोकण यांच्यात न्यायालयीन प्रकरण उद्धभवल्यास ते मुंबई शहर येथील मा. न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी व खर्च सबंधित संस्थेचा राहील.

**९) दिवाळखोरी आणि कर्तव्यात कसुरीसाठी दरकरार समाप्ती:-**

१. दिवाळखोरीसाठी समाप्ती:-

स्विकृत निविदाकार संस्था दिवाळखोर आढळल्यास, अशा संस्थेस सह सचिव राज्य सेवा हक्क आयोग तथा अध्यक्ष, खरेदी समिती, राज्य सेवा हक्क आयोग, कोकण महसुली विभाग, कोकण हे १ महिन्याची नोटीस देऊन कोणतीही नुकसान भरपाई न देता कार्यादेश/करार संपुष्टात आणेल.

२. खालीलप्रमाणे सेवा करार संपुष्टात आणण्यात येईल:

अ) शासनाने कार्यादेशाद्वारे दिलेल्या कालावधीत किंवा वाढीव कालावधीत स्विकृत निविदाकर संस्था सेवा देण्यास अयशस्वी ठरल्यास.

ब) स्विकृत निविदाकार संस्था कार्यादेश व करारांतर्गत दिलेल्या अटी व शर्तीनुसार कोणत्याही जबाबदा-या पार पाडण्यात अयशस्वी ठरल्यास.

**१०) निविदा दोन लिफाफे प्रणालीनुसार स्विकारली जाईल:-**

**अ. लिफाफा क्र.१ :- तांत्रिक निविदा**

**(तांत्रिक निवेदेत खालील कागदापत्रांच्या प्रमाणित/साक्षांकीत प्रती जोडाव्यात.)**

| | |
|---|---|
| १. | तांत्रिक निविदा प्रपत्र (परिशिष्ट-१) |
| २. | संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (दुकाने संस्था अधिनियम, १९४८/कंपनी नोंदणी अधिनियम/सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम, २००६/ दुकाने व आस्थापना अधिनियम, २०१७/ उद्यम आधार नोंदणी इ. |
| ३. | संस्थेचे मुख्यालय नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत असणे बंधनकारक असून, त्यासाठी निविदाकारांनी त्याबाबतचा पुरावा सादर करावा. |
| ४. | बयाणा रक्कम भरल्याची पावती सोबत जोडण्यात यावी. अथवा, बयाणा रक्कम भरण्याच्या अटीतून सूट देण्यात आली असल्यास, त्याअनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्र सादर करण्यात यावेत. तसेच, एम.एस.एम.ई/ उद्यम आधार नोंदणी प्रमाणपत्र/ Startup Recognition Certificate इ. मधील नोंदणीची बाब ही निविदेतील नमूद सेवेशी मिळतीजुळती असल्यासच निविदाकारारा बयाणा रक्कम मधून सूट देण्यात येईल, अन्यथा निविदाकारास अपात्र करण्यात येईल. |
| ५. | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियमांतर्गत नोंदणी प्रमाणपत्र जोडावे. |
| ६. | कर्मचारी राज्य विमा अधिनियमांतर्गत नोंदणी प्रमाणपत्र जोडावे. |
| ७. | कंत्राटी कामगार अधिनियमाच्या अंतर्गत कंत्राटी कामगारांच्या कामासाठी कामगार आयुक्तांकडील परवान्याची प्रत जोडावी. |
| ८. | एकल कार्यादेशात (single Work Order) १० पेक्षा अधिक मनुष्यबळ सेवा पुरविल्याबाबतचा शासकीय/निमशासकीय/सहकारी कार्यालयांमध्ये कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव प्रमाणपत्र (कार्यादेशाच्या प्रती जोडण्यात येऊ नयेत ) |
| ९. | आयकर नोंदणी क्रमांक (PAN Card/ TAN Card) छायांकित प्रत. तसेच, संस्थेच्या नावाने लगतच्या तीन आर्थिक वर्षाच्या कालावधीचे आयकर रीटर्न भरल्याच्या कागदपत्रांच्या प्रतींची छायांकित प्रत सोबत जोडण्यात याव्यात. (आर्थिक वर्ष २०२३-२४, आर्थिक वर्ष २०२४-२५, आर्थिक वर्ष २०२५-२०२६ |
| १०. | वैध वस्तू व सेवाकर नोंदणी (GST Registration) प्रमाणपत्र तसेच, लगतच्या ३ महिन्यांचा वस्तू व सेवाकर (GSTR-३B) रीटर्न भरल्याच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडण्यात याव्यात. |
| ११ | कोणत्याही शासकीय/निमशासकीय/सहकारी संस्थेने निविदाकार संस्थेस काळया यादीत टाकले नसल्याचे/बंदी घातले नसल्याचे व कोणताही खटला दाखल केलेला नसल्याचे स्वप्रमाणीत हमीपत्र आवश्यक आहे. |

**सर्व तांत्रिक निविदा दस्तऐवज वरील अनुक्रमांमध्ये निर्देशांक पृष्ठ आणि पृष्ठ क्रमांकांसह सादर करावेत.**

१) १०-अ मधील विविध दस्तऐवजाची निविदाकार पुर्तता करीत नसल्यास, खरेदी अध्यक्ष नोंद घेईल आणि त्या निविदाकर्त्यांचा लिफाफा क्र. २ पुढील कार्यवाहीसाठी विचारात घेण्यात येणार नाही. तांत्रिक निविदा तपासणीनंतर पात्र असल्याचे आढळून आलेल्या निविदाकारांचा अतांत्रिक/वित्तीय निविदा उघडण्यात येईल.

२) तांत्रिक निविदा उघडल्यानंतर त्यांची छाननी करुन पात्र व अपात्र उमेदवार ठरविण्यात येतील. अपात्र उमेदवारांच्या निविदा नाकारण्यात येतील व त्यांची बयाणा रक्कम (EMD) परत करण्यात येईल.

३) काही अपरिहार्य कारणांमुळे निविदा प्रक्रियेतील वेळापत्रकात बदल होऊ शकतो.

**ब) लिफाफा क्र. २:- अतांत्रिक/वित्तीय निविदा**

१) अतांत्रिक/वित्तीय निविदा परिशिष्ट २ मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार असावी.

२) किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१९ प्र.क्र.१३/कामगार-८, दिनांक २२.०२.२०१९ किमान वेतन कायद्यातील तरतूदीनुसार वेतन निश्चित केले आहे. त्यानुषंगाने सध्यस्थितीत, किमान वेतन अधिनियम, १९४८ नुसार विहित केल्याप्रमाणे किमान वेतन व विविध कामगार कायद्यांन्वये वेळोवेळी निश्चित केलेल्या दरांनुसार अनुज्ञेय वेतन, भत्ते व वजावटी विचारात घेऊन प्रतिमाह प्रतिशिपाई रु.२०,६४८/-(वस्तु व सेवाकर आणि सेवाशुल्क वगळून) इतके ठोक वेतन निर्धारीत करण्यात येत आहे. याबाबतचे विवरण खालीलप्रमाणे असून, निविदाकाराने खालील मोबदल्याच्या अनुषंगाने मनुष्यबळ पुरविण्यासाठी त्यांच्या संस्थेमार्फत आकारण्यात येणाऱ्या सेवा आकाराची (Service Charges) रक्कम भारत सरकारच्या वित्त विभागाच्या दिनांक ०६.०१.२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेश क्र. F.६/१/२०२३-PPD मध्ये विहित केल्यानुसार टक्केवारीमध्ये नमूद करावी

| बाहययंत्रणेवरील शिपाई चे मानधन | | |
|---|---|---|
| अ.क्र. | बाब | रक्कम (रु.) |
| १ | मुळ किमान वेतन दर | १०,०२१/- |
| २ | विशेष भत्ता/महागाई भत्ता | ४१३४/- |
| ३ | एकुण मूळ वेतन (१+२) | १४१५५ |
| ४ | इतर भत्ते | २१०० |
| ५ | घरभाडे भत्ता (५% एकूण मूळ वेतनावर) | ७०७.७५/- |
| ६ | भविष्य निर्वाह निधी (PF) ( १३% एकूण मुळ वेतनावर) | १८४०.१५/- |
| ७ | राज्य कामगार विमा योजना (ESIC) ( ३.२५% एकूण मुळ वेतनावर) | ४६०.०४/- |
| ८ | व्यावसायिक कर (P.T.) | २००/- |
| ९ | बोनस (८.३३% एकूण मुळ वेतनावर) | ११७९.११ |
| १० | कामगार कल्याण निधी (दर ०६ महिन्या करिता रु. ३६/-) | ६/- |
| ११ | एकुण मासिक ठोक मानधन | २०६४८/- |

**<u>११) अतिरीक्त अटी व शर्ती:-</u>**

१. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि.२२.०२.२०१९ रोजीच्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे शिपाई यांना किमान वेतन दराने वेतन तसेच, देय असलेले कायदेशीर दायित्व उदा. भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा (ESIS), कामगार कल्याण निधी, घरभाडे भत्ता, बोनस इ. बाबी विहित पद्धतीने नियमानुसार संबंधित प्राधिकरणांकडे जमा करण्याची जबाबदारी मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थेची असेल. त्या कपातीसंदर्भात कागदपत्रे प्रत्येक वेतनदेयकासोबत सादर करणे अनिवार्य असेल.

२. अंतिम निवड झालेल्या निविदाकार संस्थेस मनुष्यबळाचा पुरवठा करणे अनिवार्य राहील. तसेच, सदर संस्थेस मनुष्यबळ सेवा पुरवठा करण्याकरीता विभागाने निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार राज्य सेवा हक्क

आयोग, कोकण महसुली विभाग, कोकण भवन विभागासोबत रु. ५००/- च्या मुद्रांक पत्रावर करारनामा करणे बंधनकारक राहील.

३. प्रसिध्द करण्यात आलेली निविदा कोणत्याही वेळी, कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही टप्प्यावर पूर्णतः किंवा अंशतः रद्द करण्याचा अथवा निविदा प्रक्रियेत/मसुद्यामध्ये फेरबदल करण्याचा संपूर्ण अधिकार राज्य सेवा हक्क आयोग, कोकण महसुल विभाग, कोकण भवन यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

४. शासनाकडून वेतन देयक अदा करण्यापूर्वीच यशस्वी निविदाकार संस्थेने शिपाई यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत शिपाई यांच्या बँक खात्यात RTGS/NEFT द्वारे जमा करून शिपाई यांस वेतनचिठ्ठी देणे अनिवार्य राहील. तसेच यशस्वी निविदाकार संस्थेकडून शिपाई यांस वेतन अदा करण्यास विलंब झाल्यास प्रतिदिन प्रति शिपाई रु. १००/- इतका दंड आकारण्यात येईल.

५. वरिल परिच्छेद ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतन अदा केल्यानंतर यशस्वी निविदाकार संस्थेने वेतनाचे मासिक देयक प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत विभागाकडे जमा करावे. तद्नंतर शासनाकडून मंजूर दरानुसार पुरवठादार संस्थेस देयक अदा करण्यात येईल. पुरवठादार संस्थेस कोणत्याही प्रकारचे अग्रीम देयक अदा करण्यात येणार नाही.

६. पुरवठादाराने आहरण व संवितरण अधिकारी, (रा.से.आ/कक्ष-२), राज्य सेवा हक्क आयोग, कोकण महसुली विभाग, कोकण भवन यांच्याकडे बँक खात्याचा तपशील सादर करणे आवश्यक राहील. सर्व परिपूर्ण माहीतीसह देयक सादर करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील व प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

७. निवड झालेल्या निविदाकार संस्थेने करार करण्यास नकार दिल्यास तसेच, करारातील अटींचे उल्लंघन केल्यास, संस्था अपात्र ठरविण्यात येवून संस्थेची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल आणि दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

८. यशस्वी निविदाकार संस्थेस विभागाशी असलेला करार संपल्यानंतरही पुढील दर करार होईपर्यंत निविदा सुचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्तीनुसार सेवा उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल. तसेच, पुरवठा केलेले मनुष्यबळ योग्य दर्जाचे नसल्याचे विभागाच्या निदर्शनास आल्यास, सदर करार कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येईल. सदर करार केव्हाही संपुष्टात आणण्याचे अथवा त्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार शासनास राहतील.

९. निविदा मसुद्याचे सूक्ष्म अवलोकन करून परिपूर्ण निविदा सादर करण्याची दक्षता निविदाकाराने घ्यावी.

१०. यशस्वी निविदाकार संस्थेस मनुष्यबळ पुरविण्याचे आदेश प्राप्त झाल्यापासून दहा दिवसांच्या आत मागणीनुसार मनुष्यबळ उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल. अन्यथा प्रति दिन, प्रति व्यक्ती रु.१००/- इतका दंड संस्थेकडून आकारण्यात येईल अथवा संस्थेच्या अनामत/बयाणा रक्कमेतून सदर दंडाची रक्कम वसूल करण्यात येईल.

११. शिपाई ०२ पदांकरीता अकुशल मनुष्यबळाची सेवा उपलब्ध करून देणे, यशस्वी निविदकार संस्थेस बंधनकारक आहे. तथापि, विभागाने यापेक्षा कमी अथवा अधिक पदांकरीता मनुष्यबळ सेवा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिल्यास, निर्देशाप्रमाणे मनुष्यबळ सेवा उपलब्ध करून देणे पुरवठादार संस्थेवर बंधनकारक राहील व त्याप्रमाणे पुरवठादार संस्थेस वेतन अदा करण्यात येईल.

१२. यशस्वी निविदाकार संस्थेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या शिपाई यांची सचोटी व चारित्र्याबाबतचा पोलिसांचा दाखला संस्थेने सादर करणे बंधनकारक असेल. कार्यालयीन कामकाजात शिपाईकडून कसूर अथवा आर्थिक

गैरव्यवहार झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी यशस्वी निविदाकार संस्थेची राहील आणि झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली संबंधित संस्थेकडून करण्यात येईल.

१३. यशस्वी निविदाकार संस्थेकडून उपलब्ध होणाऱ्या शिपाई यांच्या सेवा पूर्णपणे कंत्राटी व तात्पुरत्या स्वरूपाच्या असून, त्यांना भविष्यात या पदावर नियुक्तीचा अधिकार प्राप्त होणार नाही. तसेच, कायमस्वरूपी शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले अन्य कोणतेही लाभ मिळणार नाहीत, तसेच, त्यांच्या सेवेचे उत्तरदायित्त्व शासनावर असणार नाही.

१४. यशस्वी निविदाकार संस्थेकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या शिपाई यांचे करार कालावधीत निधन झाल्यास उमेदवार/संस्था यांना शासनातर्फे कोणतीही भरपाई अनुज्ञेय असणार नाही.

१५. शासकीय कामकाजाच्या अनुषंगाने आवश्यक त्या गोपनीयतेचा भंग होणार नाही, याची जबाबदारी संबंधित शिपाई यांची तसेच, यशस्वी निविदाकार संस्थेची असेल. गोपनीयतेचा भंग झाल्यास त्या संदर्भात यशस्वी निविदाकार संस्था तसेच संबंधित शिपाई यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे हक्क राज्य सेवा हक्क आयोग, कोकण महसुली विभाग, कोकण भवन यांना राहतील.

१६. यशस्वी निविदाकार संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या शिपाई यांना कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत कार्यालयात उपस्थित असणे बंधनकारक राहील. आवश्यकतेनुसार कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयात थांबावे लागेल. तसेच, वेळप्रसंगी कामाची निकड विचारात घेऊन सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

१८. यशस्वी निविदाकार संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या शिपाई यांनी शासनाच्या मालमत्तेची काळजी घेणे/देखभाल करणे आवश्यक राहील. शासनाच्या झालेल्या नुकसानाची जबाबदारी संबंधित यशस्वी निविदाकार संस्थेवर असेल व झालेल्या नुकसानाची वसुली यशस्वी निविदाकार संस्थेकडून करण्यात येईल.

१९. यशस्वी निविदाकार संस्थेने अन्य सेवा पुरवठादार संस्थेशी उपकरार करण्यास प्रतिबंध आहे. तथापि, संस्थेने अशा प्रकारे उपकरार केल्याचे निदर्शनास आल्यास संस्थेशी करण्यात आलेला करार रद्द करण्यात येवून संस्थेने भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल आणि संस्थेवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

२०. यशस्वी निविदाकार संस्थेस उपलब्ध करून दिलेल्या प्रत्येक शिपाई यांचे संपूर्ण नाव, वास्तव्याचा पत्ता, शैक्षणिक अर्हतेचा तपशिल, नमुना स्वाक्षरी, कायमस्वरूपी वास्तव्याचा पत्ता इत्यादी माहिती व पासपोर्ट साइज फोटो विभागास उपलब्ध करून द्यावा.

२१. मनुष्यबळ पुरवठा करण्याकरीता शासनाच्या प्रचलित सर्व नियमांचे पालन करण्याची जबाबदारी यशस्वी निविदाकार संस्थेची राहील.

२२. यशस्वी निविदाकार संस्थेने बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करुन दिलेल्या शिपाई यांना ठोक वेतन अदा करावे. तसेच सेवाशुल्कात सेवाकरार कालावधीमध्ये कोणताही बदल होणार नाही.

२३. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, दि. ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये निर्गमित शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपद्दतीची सुधारीत नियमपुस्तिका व त्याअंतर्गत वेळोवेळी निर्गमित विविध शासन निर्णयांनुसार सुक्ष्म व लघु उद्योग तसेच, स्टार्टअप घटकांकरीता अनुज्ञेय तरतूदी निविदा प्रक्रियेस लागू राहतील. सदर तरतूदींचा लाभ घ्यावयाचा असल्यास वैध कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

## १२) निविदाकाराची अंतिम निवड:-

तांत्रिक अहर्तेमध्ये पात्र ठरलेल्या संस्थांच्या अतांत्रिक/वित्तीय निविदा विचारात घेण्यात येतील. सर्वात न्यूनतम सेवाशुल्क असलेल्या निविदाकाराची (एल-१) निवड करण्यात येईल.

एकापेक्षा अधिक निविदाकारांचे न्यूनतम दर (सेवाशुल्क) समान असल्यास, शासकीय कार्यालयात मनुष्यबळ पुरविण्याचा अनुभव (संख्या व कालावधी) विचारात घेऊन संस्थेची अंतिम निवड करण्यात येईल. (शासकीय कार्यालयाचे नाव, मनुष्यबळ पुरवठा संख्या व कालावधी याबाबतचे विवरण संस्थेच्या लेटरहेडवर आवश्यक त्या पुराव्यासह सादर करावे.)

**मी/आम्ही वरील निविदा सूचनेतील सर्व कलमे (अ.क्र. १ ते १२) काळजीपूर्वक वाचली असून, मी/आम्ही सदर निविदा सूचनेतील सर्व अटींशी सहमत आहे/आहोत.**

दिनांक:-

ठिकाण:-

**निविदाकार संस्थेचे नाव, स्वाक्षरी व शिक्का**

## परिशिष्ट --१
## तांत्रिक निविदा प्रपत्र (Technical Bid)

**टिप:-निविदाकार संस्थेने सर्व आवश्यक माहिती निविदा प्रपत्रात भरावी व पुराव्याच्या समर्थनार्थ कागदापत्रांच्या प्रमाणित/साक्षांकीत प्रती जोडाव्यात.**

| | |
|---|---|
| १) | निविदाकार संस्थेचे/कंपनीचे नाव व पत्ता:- |
| २) | संपर्क क्रमांक:-<br>अ) दुरध्वनी क्र.:- ब) भ्रमणध्वनी क्र.:-<br>क) ई-मेल:- ड) फॅक्स:- |
| ३) | बँकेचे नाव व पत्ता:-<br>अ) बँक कोड:- ब) खाते प्रकार:-<br>क) बँक खाते क्रमांक:- ड) MICR कोड:-<br>इ) IFSC कोड:- |
| ४) | संस्थेचे नोंदणी क्रमांक व प्रमाणपत्र (दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ / कंपनी नोंदणी अधिनियम/सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास अधिनियम, २००६/ दुकाने व आस्थापना अधिनियम, २०१७/उद्यम आधार नोंदणी इ.):- |
| ५) | संस्थेचे मुख्यालय नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत असणे बंधनकारक असून, त्यासाठी निविदाकारांनी त्याबाबतचा पुरावा सादर करावा. |
| ६) | बयाणा रक्कम भरल्याची पावती सोबत जोडण्यात यावी. अथवा, बयाणा रक्कम भरण्याच्या अटीतून सूट देण्यात आली असल्यास, त्याअनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्र सादर करण्यात यावेत. तसेच, एम.एस.एम.ई/ उद्यम आधार नोंदणी प्रमाणपत्र / Startup Recognition Certificate इ. मधील नोंदणीची बाब ही निविदेतील नमूद सेवेशी मिळतीजुळती असल्यासच निविदाकारास बयाणा रक्कम मधून सूट देण्यात येईल, अन्यथा निविदाकारास अपात्र करण्यात येईल. |
| ७) | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियमांतर्गत नोंदणी क्रमांक व प्रमाणपत्र:- |
| ८) | कर्मचारी राज्य विमा अधिनियमांतर्गत नोंदणी क्रमांक व प्रमाणपत्र:- |
| ९) | व्यवसाय कर अधिनियमांतर्गत नोंदणी क्रमांक व प्रमाणपत्र:- |
| १०) | कंत्राटी कामगार अधिनियमाच्या अंतर्गत कंत्राटी कामगारांच्या कामासाठी कामगार आयुक्तांकडील परवान्याची प्रत जोडावी. |
| ११) | ISO. १०६६७-२:२०२० प्रमाणपत्राची प्रत जोडावी. |
| १२) | कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेकडून जारी करण्यात आलेल्या किमान रु. २५,००,०००/- रक्कमेचे सॉलव्हन्सी/राष्ट्रीयकृत बँकेचे पत प्रमाणपत्र जोडावे. |
| १३) | एकल कार्यादेशात (single Work Order) १० पेक्षा अधिक मनुष्यबळ सेवा पुरविल्याबाबतचा शासकीय/निमशासकीय/सहकारी कार्यालयांमध्ये कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव |
| १४) | आयकर नोंदणी क्रमांक (PAN Card/ TAN Card) छायांकित प्रत. तसेच, संस्थेच्या नावाने लगतच्या तीन आर्थिक वर्षाच्या कालावधीचे आयकर रीटर्न भरल्याच्या कागदपत्रांच्या प्रतींची |

| | |
|---|---|
| | छायांकित प्रत सोबत जोडण्यात याव्यात. (आर्थिक वर्ष २०२३-२४, आर्थिक वर्ष २०२४-२५, आर्थिक वर्ष २०२५-२६) |
| १५) | वैध वस्तू व सेवाकर नोंदणी (GST Registration) प्रमाणपत्र तसेच, लगतच्या ३ महिन्यांचा वस्तू व सेवाकर (GSTR-३B) रीटर्न भरल्याच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडण्यात याव्यात. |
| १६) | कोणत्याही शासकीय / निमशासकीय/ सहकारी संस्थेने निविदाकार संस्थेस काळ्या यादीत टाकले नसल्याचे/बंदी घातले नसल्याचे व कोणताही खटला दाखल केलेला नसल्याचे स्वप्रमाणित हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| १७) | किमान वेतन अधिनियमांतर्गत वेतन व इतर अनुज्ञेय भत्ते कर्मचा-यांना अदा करण्यात येईल, याबाबत स्वप्रमाणित करणे आवश्यक आहे. |

(तांत्रिक निविदेतील सर्व पृष्ठे अनुक्रमित असावी व त्यावरील सर्व पृष्ठांवर अधिकृत स्वाक्षरीकाराने स्पष्ट स्वाक्षरी केलेले व मुद्रांकीत केले पाहिजे)

**मी/आम्ही वरील निविदा दस्तएवजांचे सर्व नियम व अटी काळजीपूर्वक वाचल्या आहेत आणि मी/आम्ही त्यांचे पालन करण्यास बांधील आहे/आहोत.**

**दिनांक:-**

**ठिकाण:-**

निविदाकार संस्थेचे नाव, स्वाक्षरी व शिक्का

# परिशिष्ट-२

१. निविदाकार संस्थेचे नांव:-

२. उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि.२२.०२.२०१९ रोजीच्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे शिपाई यांना निश्चित होणाऱ्या वेतनाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | बाब | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १ | मुळ किमान वेतन दर | १०,०२१/- |
| २ | विशेष भत्ता/महागाई भत्ता | ४१३४/- |
| ३ | एकुण मूळ वेतन (१+२) | १४१५५ |
| ४ | इतर भत्ते | २१०० |
| ५ | घरभाडे भत्ता (५% एकूण मूळ वेतनावर) | ७०७.७५/- |
| ६ | भविष्य निर्वाह निधी (PF) ( १३% एकूण मुळ वेतनावर) | १८४०.१५/- |
| ७ | राज्य कामगार विमा योजना (ESIC) ( ३.२५% एकूण मुळ वेतनावर) | ४६०.०४/- |
| ८ | व्यावसायिक कर (P.T.) | २००/- |
| ९ | बोनस (८.३३% एकूण मुळ वेतनावर) | ११७९.११ |
| १० | कामगार कल्याण निधी (दर ०६ महिन्या करिता रु. ३६/-) | ६/- |
| ११ | **एकुण मासिक ठोक मानधन** | **२०६४८/-** |
| १२ | वस्तु व सेवा कर (१८%) | ३७१६.६४ |
| १३ | एकूण मोबदल्याची रक्कम पुर्णांकित | ३७१७/- |

३. उपरोक्त अ.क्र. ११ येथील एकूण मासिक ठोक मानधनावर सेवा शुल्क (%) (प्रतिमाह/प्रति शिपाई):-

दिनांक:-

ठिकाण:-

निविदाकार संस्थेचे नाव, स्वाक्षरी व शिक्का